# स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई.
(अधिष्ठाता यांचे कार्यालय)


SWAMI RAMANAND TEERTH RURAL GOVT. MEDICAL COLLEGE, AMBAJOGAI DIST BEED
PH NO (02446)245792/248963/249362/248438/-DFAX02446/247132 Website www.srtrmca.org emailsrt.acad@rediffmail.com


जा.क्र. वैम/किमाँवि/पुरवठा आदेश/ 5652 /२०२४ दिनांकः- ~~-/०९/२०२४~~ 19/09/2024

कार्यालयीन आदेश

विषय :-संगणक,प्रिंटर व झेरॉक्स मशीनकरीता दैनंदिन वापराकरीता लागणाऱ्या किरकोळ साहित्यांचे दरपत्रक सादर करणे बाबत...

संदर्भ :-१.दि.१८.०४.२०२४ रोजीची खरेदी समितीची बैठक.
२.दि.२४.०४.२०२४ रोजीची मंजुर टिपणी.

उपरोक्त विषयी संदर्भ क्र. १ व २ अन्वये आपणास कळविण्यात येते की, या महाविद्यालयातील विविध विषयांचे विभाग, ग्रंथालय विभाग,प्रशासकीय कार्यालय व कोरोना विषाणु प्रयोगशाळेकरीता संगणक,प्रिंटर व झेरॉक्स मशीनकरीता दैनंदिन वापरायोग्य नविन टोनर, टोनर रिफिलींग, ॲन्टीव्हायरस, किबोर्ड, लॅन केबल, रॅम, एसएमपीएस, मदरबोर्ड, माऊस, युपीएस व इ. किरकोळ साहित्यांचे दरपत्रक खालील प्रमाणे सोबत जोडलेल्या यादीनुसार सादर करण्यात यावे.

तसेच सदर सुचनेनुसार मोहरबंद दरपत्रके मा.अधिष्ठाता,स्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई यांच्या नावे सादर करण्यात यावी.तसेच सदरील साहित्यांचे दरपत्रक सादर करण्यासाठी अंतिम दिनांक 27/09/२०२४ रोजी दुपारी ०५:०० वा. पर्यंत असून प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक 30/09/२०२४ रोजी प्रशासकीय कार्यालयात खरेदी समिती समक्ष उघडण्यात येतील.

| अ.क्र. | साहित्यांचेनाव | नग संख्या | प्रत्येकी दर |
|---|---|---|---|
| ... | सोबत अ.क्र.०१ ते अ.क्र.२४ पर्यंतची यादी पान क्र. ३ वर देण्यात आलेली आहे. | एकुण २४ नग | ... |

अटी व शर्ती :-

०१.दरपत्रक धारकाने मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ नुसार दुकानाचे शासनमान्य नोंदणी प्रमाणपत्र किंवा दरपत्रक धारकाकडे सुक्ष्म,लघु व मध्यम उद्यम मंत्रालय भारत सरकार यांच्याकडे नोंदणी केलेले उद्योग आधार प्रमाणपत्र छायांकीत प्रत दरपत्रक सोबत जोडणे बंधनकारक आहे.

०२.दरपत्रक धारकाच्या दुकानाचे नाव, संपुर्ण पत्ता, नोंदणी क्रमांक,जिएसटी नंबर व पॅन नंबर असलेल्या दुकानाच्या लेटर पॅडवर सहि व शिक्का असलेली दरपत्रके सदर साहित्याच्या अ.क्र. यादीनुसार सादर करण्यात यावी. तसेच ज्या साहित्यांचे दर उपलब्ध होऊ शकत नाहित त्या साहित्यांच्या दराच्या ठिकाणी एन.ए. (NA) असे नमुद करावे.

०३.दरपत्रक सोबत शासनमान्य जिएसटी प्रमाणपत्र, फर्मच्या नावाचे किंवा प्रोप्रायटरच्या नावाचे पॅन कार्डची छायांकीत प्रत,सन २०२२-२३ किंवा सन २०२३-२४ या वर्षाचे आयटीआर प्रमाणपत्र जोडण्यात यावेतसेच एकल दरपत्रक धारक असल्याचे स्वतः स्वाक्षरीचे प्रपत्र-अ जोडणे बंधनकारक आहे. (सदर प्रपत्र-अ नमुना पान क्र. ०४ वर देण्यात आलेला आहे.)

०४.दरपत्रकातील साहित्यांच्या दरातजीएसटी कर समाविष्ठ करण्यात आला आहे किंवा अतिरिक्त आकारला जाणार आहे याबाबत नमुद करणे बंधनकारक आहे. तसेच दरपत्रकातील दर बाजार भावापेक्षा जास्त दराचे सादर करण्यात येऊ नये.तसेच सर्व साहित्य स्वतः स्वखर्चाने दहा दिवसांच्या आत पुरवठा करणे बंधनकारक राहिल. तसेच वाहतुक खर्च किंवा इतर कोणताही जादा खर्च देण्यात येणार नाही.

०५.मागविण्यात आलेल्या साहित्यांचे दरपत्रक प्रमाणित झाल्याच्या दिनांका पासुन सहा (०६) महिण्यांपर्यंत वैध राहतील.

०६.प्रशासकीय कारणास्तव देयके अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब शुल्क किंवा व्याज देण्यात येणार नाही.

०७.पुरवठा करण्यात येणारे साहित्य नामांकीत कंपनीचेगॅरंटी व वारंटीसह चांगल्या प्रतीचे असावे. हलके किंवा निकृष्ठ दर्जाचे असल्यास पुरवठा आदेश रद्द करण्यात येतील तसेचरद्द करण्यात आलेल्या आदेशाचे कोणतेही देयक अदा केले जाणार नाही व याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहिल.

०८.तसेच अपुर्ण माहितीसह व प्रमाणपत्रा शिवाय सादर केलेली संबंधीतांची दरपत्रके विना स्पष्टीकरन नाकारण्यात येतील व याबाबत कसल्याही प्रकारे लेखी स्वरुपात कळविण्यात येणार नाही. तसेच कोणतेही उर्वरीत प्रमाणपत्र पुनश्च: मागविण्यात येणार नाहीत.तसेच प्रशासकीय कारणास्तव किंवा निधी अभावी काही अडचण निर्माण झाल्यास साहित्य खरेदीबाबत सदरच्या दरपत्रकाची संपुर्ण प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार अधिष्ठाता यांना राहील.

०९.संगणक,प्रिंटर व झेरॉक्स मशीनकरीता पुरवठा आदेशानुसार पुरवठा करण्यात येणारे साहित्य संबंधीत उपभोक्ता विभागास मोफत (विना शुल्क) व्यवस्थितरित्या अत्यंत तात्काळ बसवुन (प्रस्थापीत करुन) सुरु करुन देण्यात यावे .तसेच संगणक,प्रिंटर व झेरॉक्स मशीन यांच्या दैनंदिन वापरात किरकोळ साधारण दुरुस्ती (कोणत्याही नविन साहित्याचा वापर न करता) असल्यास अत्यंत तात्काळ मोफत (विना शुल्क) करुन देण्यात यावी.याकरीता कसल्याहि प्रकारचे सर्विस चार्ज (देयक) अदा करण्यात येणार नाही.

१०.उपरोक्त प्रमाणे अटी व शर्ती मान्य असल्यासच सदरचे दरपत्रक सादर करावे.

अधिष्ठाता
स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.म.,अंबाजोगाई.

प्रत:- १.संस्थेची वेबसाईट ,स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.म. अंबाजोगाई.
२.नोटीस बोर्ड महाविद्यालय विभाग,स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.म. अंबाजोगाई.

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई महाविद्यालयातील विविध विषयांचे विभाग, ग्रंथालय विभाग, प्रशासकीय कार्यालय व प्रयोगशाळेकरीता संगणक,प्रिंटर व झेरॉक्स मशीनकरीता दैनंदिन वापरायोग्य नविन टोनर, टोनर रिफिलींग, अॅन्टीव्हायरस, किबोर्ड, लॅन केबल, रॅम, एसएमपीएस, मदरबोर्ड, माऊस, युपीएस व इ. किरकोळ साहित्यांचे दरपत्रक खालील प्रमाणे यादीनुसार सादर करण्यात यावे.

| Sr.no. | Name of the Item | Model No. | Qunt. | Rate |
|---|---|---|---|---|
| ०१ | Tonner Cartridge Canon Classic MF 4820D | 328 Starter | ०१ | .. |
| ०२ | Tonner Cartridge Hp LaserJet Pro M403dn | 28 A | ०१ | .. |
| ०३ | Tonner Cartridge Canon Image Classic MF-3010 | 925 Starter | ०१ | .. |
| ०४ | Tonner Cartridge Brother DCP L2520D | TN-2365 | ०१ | .. |
| ०५ | Tonner Cartridge HP LaserJet 1005 | 112A | ०१ | .. |
| ०६ | Tonner Cartridge Samsung ML-3310D (MLT) | 205 L / 205 S | ०१ | .. |
| ०७ | Tonner Cartridge Samsung SCX-4521F | JSP 1610 | ०१ | .. |
| ०८ | Tonner Cartridge Samsung ML3471 ND | 206 L / 206 S | ०१ | .. |
| ०९ | Tonner Cartridge Samsung SCX 4321 NJ | 4521 | ०१ | .. |
| १० | Tonner Cartridge RICOH Xerox C2003 | MP3554C | ०१ | .. |
| ११ | Tonner Cartridge SHARP Xerox AR 5620D | AR-5620d-L | ०१ | .. |
| १२ | Tonner Cartridge HP Laser Jet Xerox MFP | M72625 (BOISB - 1701-00) | ०१ | .. |
| १३ | Keyboard Wireless | Circle C50 | ०१ | .. |
| १४ | Keyboard Wired | Circle A80 | ०१ | .. |
| १५ | Mouse Wireless | C50 | ०१ | .. |
| १६ | Mouse Wired | A80 | ०१ | .. |
| १७ | Tonner HP Desk Jet 1112 | 1112 | ०१ | .. |
| १८ | Tonner HP Color Laser 71025 | 150nw | ०१ | .. |
| १९ | Tonner HP Tri-Color | 803 | ०१ | .. |
| २० | Telephone Wire (2,4,10 pair) | NA | ०१ | .. |
| २१ | Telephone Wire (Drop Wire) | NA | ०१ | .. |
| २२ | Telephone Line Cord | NA | ०१ | .. |
| २३ | Telephone Connector | NA | ०१ | .. |
| २४ | Tonner Cartridge Hp LaserJet ProMFP 4000 dn | -- | ०१ | |

नोट :-उपरोक्त प्रमाणे सर्व साहित्य चांगल्या प्रतीचे टिकाऊ तसेच बाजारभावा प्रमाणे रास्त असणे आवश्यक आहे. तसेच उपरोक्त प्रमाणे साहित्यांच्या Model No./Code No. चे साहित्य पुरवठा करणे बंधनकारक राहील. अन्यथा सदर साहित्य स्वीकारले जाणार नाही.तसेच दरपत्रक मागणी आदेशातील अटी व शर्ती मान्य असल्यासच सदर दरपत्रक मागणी आदेशात नमुद करण्यात आलेले आपल्या फर्मचे सर्व प्रमाणपत्र जोडण्यात यावे अन्यथा दरपत्रके रद्द करण्यात येतील.तसेच रद्द केलेल्या संबंधीत दरपत्रकाबाबत लेखी किंवा मौखीक स्वरुपात कळविण्यात येणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

अधिष्ठाता
स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.म. अंबाजोगाई

# प्रपत्र- अ

## निविदाकारांनी द्यावयाचा हमीपत्राचा नमुना

प्रमाणित करण्यात येते की, मी / आम्ही आमची संस्था ..............................................या पत्रान्वये हामी देतो की, आमचा खरेदी प्राधीकारी बरोबर कोणत्याही प्रकारे हितसंबंधाचा संघर्ष नाही. तसेच मी/आम्ही/ आमची संस्था सदर कामासाठी फक्त एकच निविदा सादर केलेली आहे. तसेच दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेण्याऱ्या अन्य संस्थामध्ये आम्हाला कोणत्याही प्रकारचे थेट स्वारस्य नाही.तरी याबाबत पुढील काळात आपल्या कार्यालयाच्या निदर्शनास आल्यास माझ्यावर होणाऱ्या दंडात्मक कार्यवाहीस मी स्वतः जबाबदार राहील. करीता सदर प्रमाणपत्र सादर करण्यात येत आहे.

दरपत्रक धारकाची स्वाक्षरी व शिक्का

दिनांक :-

नाव :-

ठिकाण :-

पत्ता :-

मो.नं. :-